राज्यातील विविध आरोग्य संस्थांसाठी यंत्रसामग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१७/प्र.क्र.२७०/आरोग्य-८
नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: २४ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/ कक्ष-३/ टे-३/ निविदा प्रक्रिया/ जिरु/ ट्राकेयु/ १७-१८/ १३०९३/१७, दिनांक २१.०८.२०१७

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७

प्रस्तावना -

राज्यातील विविध आरोग्य संस्थांसाठी (विभागिय अनुशेषांतर्गत रुग्णालये, ट्रामा केअर युनिट, नवनिर्मित रुग्णालये) यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २१.०८.२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील विविध रुग्णालयांकरीता यंत्रसामग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २१.०८.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानूसार राज्यातील आरोग्य संस्थांकरीता सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या यंत्रसामुग्रींची (अंदाजे रक्कम रु. ०९,७६,०१,१०५/-) खरेदी करण्यासाठी खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदरहू यंत्रसामग्रीची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदर यंत्रसामग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या

कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खाजरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदर खरेदीवर होणारा खर्च खालील नमूद लेखाशिर्षांअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा -

I. विभागिय अनुशेषांतर्गत रुग्णालयांकरीता खरेदी करण्यात येणा-या यंत्रसामग्रीवर खर्च "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- राज्य योजनांतर्गत योजना- प्रादेशिक असमतोल दूर करणे-(०६) (०२) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर रुग्णालये व दवाखाने - ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री (२२१० ३०४७) " या लेखाशिर्षांअंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

II. नवनिर्मित रुग्णालयांकरीता (RH, SDH, WH, DH) खरेदी करण्यात येणा-या यंत्रसामग्रीवर खर्च "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-(०६) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना- (०६) (०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने - २१, पुरवठा व सामग्री (२२१० ०२२६)" या लेखाशिर्षांअंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

III. ट्रामा केअर युनिट करीता खरेदी करण्यात येणा-या यंत्रसामग्रीवर खर्च "४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च- (०१) (०३) ट्रामा केअर युनिटची स्थापना - महाराष्ट्र आपत्कालिन वैद्यकीय सेवा - ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री (४२१० ११७३)" या लेखाशिर्षांअंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच सदर यंत्रसामग्रीच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

११) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२३१७२५०९७५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2017.10.24 12:54:17 +05'30'

(व.मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. परेल, मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर

९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

११) निवडनस्ती (आरोग्य-८)

शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१७/प्र.क्र.२७० /आरोग्य-८, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र

अ.क्र	यंत्रसामग्रीचे नाव	खरेदी करावयाची संख्या			
		अ) विभागीय अनुशेषांतर्गत रुग्णालयांकरीता	ब) नवनिर्मित रुग्णालयांकरीता	क) ट्रामा केअर युनिटकरीता	एकूण
1	300M.A. X ray machine	2	8	-	10
2	Iron Cots	60	368	64	492
3	Bedside Locker	60	455	100	615
4	Linen Trolley	4	18	-	22
5	Instruments Trolley	5	44	-	49
6	Stretcher on Trolley	4	54	-	58
7	Wheel Chair	6	57	12	75
8	Medicine Trolley	8	37	-	45
9	Attendant Stool	60	445	100	605
10	Mobile O.T.Light	2	17	-	19
11	Auto Clave 2 Drum	4	20	-	24
12	Computerized ECG Machine	3	19	9	31
13	Operation Table (Ordinary)	2	13	-	15
14	Cell counter 3 parts	1	4	-	5
15	Surgical diathermy (Cautery Machine)	4	13	9	26
16	Lobour table with head low facility	5	23	-	28
17	Foetal monitor	3	15	-	18
18	Suction machine	4	17	-	21
19	Fowler Bed	-	10	20	30
20	Portable X-Ray Machine 100 mA	-	2	9	11
21	Dental X-Ray Machine	-	1	-	1
22	Boyles Appratus	-	10	-	10
23	Head light	-	7	-	7
24	Pulse Oxymeter	-	11	9	20
25	Operation table (Hydraulic)	-	8	-	8
26	Double Dome Shadowless ceiling mounted O.T.lights	-	10	-	10
27	MTP High Vacuum Suction	-	5	-	5
28	Suction Apparatus (Electrical)	-	20	-	20
29	Foot Suction Machine	-	10	-	10
30	Gynaec Electric Cautery	-	5	-	5
31	Automist	-	7	-	7
32	Foot Suction Apparatus	-	5	-	5
33	Laparoscope Tubectomy set	-	5	-	5
34	No scalpel Vasectomy set	-	8	-	8
35	Bedside screen	-	3	-	3
36	Gyanec cautery	-	5	-	5
37	Dressing Trolley	-	9	-	9
38	Two Body Mortuary Cabinet	-	3	-	3
39	Microscope (Binocular)	-	8	9	17
40	Semi Auto Analyzer	-	4	-	4
41	Photo electric Calorimeter	-	4	-	4

42	Micro Pipetes	-	3	-	3
43	Water Bath	-	2	-	2
44	Hot Air Oven	-	3	-	3
45	Incubators	-	6	-	6
46	Centrifuge	-	5	-	5
47	Centrifuge (Hematocrit)	-	6	-	6
48	Hot Plates	-	1	-	1
49	Examination Table	-	29	-	29
50	Gynaec Examination Table	-	10	-	10
51	Mobile Shadow less Lamp	-	5	-	5
52	Dialysis Machine	-	2	-	2
53	R.O.Plant	-	4	-	4
54	Bio-Chemistry Analyzer (Auto)	-	2	-	2
55	Central Oxygen System	-	2	-	2
56	Cardiac Monitor Multipara	-	2	-	2
57	Warmer	-	8	-	8
58	Phototherapy Unit	-	4	-	4
59	Power Bone Drill	-	-	10	10
60	Pneumatic Tourniquet	-	-	9	9
61	C-Arm Machine	-	-	8	8
62	C-Arm Table	-	-	7	7
63	Simple Operation table for Minor O.T.	-	-	9	9

****